# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 3 मे 2025 | पान- 1


# सांडपाणी वाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी रस्त्याची खोदाई

## महापालिका प्रशासनाने त्वरीत सांडपाणी वाहिन्यांचे काम मार्गी लावण्याची मागणी

**पिंपरी | मनीषा थोरात-पिसाळ**

चिखली-आकुर्डी रस्त्यावरील राधास्वामी सत्संग कॉर्नर येथे सांडपाणी वाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी खोदाई केली आहे. रस्त्यावरील खोदकामामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे. कंत्राटदारांनी खासगी वार्डन नेमणे आवश्यक होते. मात्र चार दिवसांनंतर एकही वार्डन नसल्याने सायंकाळी वाहतूक कोंडी होत असून वाहनचालकांना त्रास सहन करावा लागतो आहे.

चिखली-आकुर्डी रस्ता आणि पिंगळे रोड रहदारीचा आहे. दररोज या मार्गावरून जवळपास सतरा पीएमपी बस, खासगी गाड्यांची वाहतूक होते. मागील पंधरा दिवसांपासून रस्त्याची खोदाई केल्याने वाहतूकीचे नियोजन विस्कळीत झाले आहे. वाहतूक पोलिसांना काम करण्यापूर्वी सूचना दिल्यामुळे त्यांनी, मोजके वाहतूक पोलिस कोंडी सोडवण्यासाठी दिले होते. कंत्राटदाराने वॉर्डन नेमावे अशा सूचना वाहतूक विभागाने दिल्या होत्या. मात्र सुरुवातीचे चार दिवस कंत्राटदारांनी वॉर्डन दिले. त्यानंतर एकही वार्डन तिथे नाही.



**पीएमपीसह कारचालकांना वळसा**

चिखलीतून ठिकठिकाणी पीएपी बस मार्गस्थ होतात. मात्र रस्ते खोदाईमुळे बस तसेच कारचालकांना वळसा घालावा लागतो आहे.

> वाहनचालकांसह नागरकांची गैरसोय टाळण्यासाठी महापालकेच्या जलनिस्सारण विभागाने लवकरात-लवकर हे काम मार्गी लावावे, म्हणजे वाहतूक सुरुळीत होण्यास मदत होईल.
>
> **- यश साने, युवा नेते**

> राधास्वामी संत्सग भवन बाजूस असलेल्या नाल्याचे पाणी या नलिकेद्वारे नेवाळे वस्तीच्या पंपीग स्टेशनला घेऊन जाण्याचे काम केले जात आहे. हे काही दिवसांचे होते मात्र तीन ते चास एसटी केबल, पाण्याच्या पाच ते सहा लाईन असल्याने तुटल्या जातात. सट्रॉमवॉटरलाईन तुटल्यानंतर त्या दुरुस्तीसाठी सहा ते सात दिवस गेले. त्यानंतर पाण्याची लाईन तुटली त्याच्या दुरुस्तीला पाच सहा दिवस गेले. आठवड्याभराचे काम राहीले आहे, मात्र गुंतागुतीच्या लाईन असल्यामुळे कामाला वेळ लागतो आहे. वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी रात्रीच्या वेळेस काम सुरु आहे.
>
> **- दामोदर तापकीर, उपअभियंता जलनिस्सारण विभाग.**

> महापालिकेच्या जलनिस्सारण विभागाला सांडपाणी वाहिन्याच्या दुरुस्तीसाठी परवानगी दिली आहे. वाहतूक सुरुळीत ठेवण्यासाठी वाहतूक पोलिस दिले आहेत. मात्र कंत्राटदारानेही खासगी वॉर्डन नेमणे आवश्यक आहेत. रस्ता बंद असल्याने इतर मार्गावरील वाहतूक काही पमाणात विस्कळीत होते आहे. हे काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना केल्या आहेत.
>
> **- मधुकर थोरात, सहाय्यक पोलस, तळवडे वाहतूक विभाग.**

> पावसाळ्यापूर्वी खोदाईची कामे पूर्ण होणे आवश्यक आहेत. रस्ते खोदाईला नंतर बंदी येते. त्यामुळे लवकरात-लवकर ही कामे मार्गी लावल्यास वाहतूक कोंडीवर ताण येणार नाही.
>
> **- मनोज जरे, उद्योजक**

---

# चिखलीत लेबर कॅम्पमधील बेकायदा दारू अड्डा उध्वस्त!

## परिसरातील सोसायटीधारकांना दिलासा : आमदार लांडगे यांची पोलिसांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील एका लेबर कॅम्पमध्ये देशी दारूचा अनधिकृत अड्डा चालवला जात होता. या ‘लेबर कॅम्प’ मध्ये तीन हजाराहून अधिक लेबर वास्तव्याला आहेत. धक्कादायक प्रकार म्हणजे या लेबर कॅम्पला लागूनच मोठी गृहनिर्माण वसाहत असून, या देशी दारूच्या अड्ड्यामुळे वारंवार वादाचे प्रसंग उद्भवले जात होते. त्यामुळे सदर दारुचा अड्डा उध्वस्त करण्यात आला.

बेकायदेशीर दारुच्या अड्ड्यामुळे स्थानिक सोसायटीधारकांनी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्याकडे तक्रार केली होती. त्या अनुशंगाने आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांना उचित कारवाई करण्याबाबत सूचना केली होती.

दरम्यान, पोलिसांनी तात्काळ दखल घेऊन हा दारूचा अड्डा उखडून टाकला. या कारवाईमुळे येथील सोसायटी धारकांनी अक्षरशः सुटकेचा निश्वास सोडला. चिखली येथील हॅरिझन आणि लेगसी रिव्हरसाईड सोसायट्यांच्या मागे असलेल्या बेकायदेशीर देशी दारूचा अड्डा चालवला जात होता. या मजूर कॅम्पमध्ये साधारण दोन ते तीन हजार मजूर वास्तव्याला आहेत. या दारू दुकानात वारंवार वादाचे प्रसंग उद्भवतात. मद्यधुंद अवस्थेतील हे मजूर सोसायटी धारकांसमोर अश्लील वर्तन करतात आणि अपशब्द वापरतात. अनेक वेळा त्यांनी सोसायट्यांवर दगड फेकले. यामुळे विशेषतः महिलांसाठी, लहान मुलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असुरक्षित वातावरण निर्माण झाले असल्याची तक्रार रहिवाशांनी केली होती.



> नागरी मध्यवस्तीत, सोसायटीच्या आवारात दारूचे दुकान असल्यास नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याबाबत राज्य विधिमंडळात निर्णय झाला. त्यानंतर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४ दारु दुकाने काही दिवसांपूर्वी ‘सील’ करण्यात आली. आता मजुरांच्या लेबर कॅम्पमध्ये बेकायदेशीर दारू अड्डा चालवला जात असल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात आली. या लेबर कॅम्पमध्ये बांगलादेशी घुसखोर असण्याची शंका स्थानिक नागरिक उपस्थित करत आहे. त्याबद्दलही पोलिसांमार्फत ‘सर्च ऑपरेशन’ करण्याची मागणी केली आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# महापालिकेच्या शाळेतील 'हायटेक' शिक्षण बंद

## 'हायटेक' शिक्षण देण्यासाठी कोट्यवधी खर्चून उभारलेली ई-लर्निंग यंत्रणा बंद

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना 'हायटेक' शिक्षण देण्यासाठी कोट्यवधी खर्चून तयार केलेली ई-लर्निंग यंत्रणा बंद पडली आहे. यामुळे मुलांना आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शिक्षण देण्याच्या योजनेला हरताळ फासला गेला आहे. या प्रकाराची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांना असूनदेखील ही यंत्रणा नेमकी का बंद पडली? याची माहिती नसल्याचे स्पष्टीकरण देखील अधिकाऱ्यांनीच दिले.

पुणे महानगरपालिकेने मोठा गाजावाजा करीत 2017 मध्ये ई-लर्निंग यंत्रणा सुरू केली. ही यंत्रणा 265 शाळांमध्ये सुरू करण्यात आली होती. यासाठी तब्बल 20 कोटी 99 लाख रुपये खर्च करण्यात आले होते. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सत्र तसेच विविध विषयांवरील माहिती देण्यासाठी पालिकेने आकाशवाणीच्या धर्तीवर स्टुडिओ देखील उभारला.




मात्र, ही यंत्रणाच बंद पडल्याने स्टुडिओसह सर्व यंत्रणा धूळ खात पडली आहे. इंटरनेटची सुविधाच नसल्याने ही यंत्रणा बंद पडल्याचे प्रशासनातील एका अधिकाऱ्याने मान्य केले आहे. रिलायन्स जिओने देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि पालिकांच्या शाळांना मोफत इंटरनेट सेवा देण्याची घोषणा केली होती.

महापालिकेने देखील पाठपुरावा करीत शाळांमध्ये ई-लर्निंग शिक्षण देण्यासाठी इंटरनेट घेतले होते. महापालिकेच्या विविध माध्यमांच्या 265 शाळांमध्ये ई-लर्निंग शिक्षण सुरू करण्यात आले होते. गरीब कुटुंबांतील सुमारे एक लाख विद्यार्थी यातून शिक्षण घेत होते. मात्र, ही यंत्रणा बंद असल्याने त्यांना आता पारंपरिक पद्धतीने शिक्षण घेण्याची वेळ आली आहे.

### केवळ इंटरनेट सेवा नसल्याने शिक्षण बंद

गेल्या सात ते आठ वर्षांपासून ई-लर्निंगच्या माध्यमातून शिक्षण देण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून प्रत्येक इयत्तेनुसार अभ्यासक्रमाचे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले होते. 265 शाळांतील वर्गखोल्यांमध्ये टीव्ही संच (स्क्रीन) तसेच शाळांसाठी संगणक देखील यासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते.

सुरुवातीला बीएसएनएलद्वारे इंटरनेट पुरविले जात होते. कोरोना काळात शाळा बंद असल्याने ही सेवा काहीशी ठप्प पडली होती. मात्र, शाळा सुरू झाल्यावर ही यंत्रणा सुरू करणे अपेक्षित असताना केवळ इंटरनेट सेवा नसल्याने संपूर्ण शहरातील ई-लर्निंग शिक्षण बंद असल्याची माहिती महापालिकेच्या प्रशासनाने दिली.

### महापालिकेची उदासीनता

» पालिकेने शाळांमध्ये जिओच्या माध्यमातून इंटरनेट सेवा घेऊन ही यंत्रणा सुरू ठेवणे अपेक्षित होते. मात्र, केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे ही यंत्रणा धूळ खात पडून आहे. थोडक्यात, पालिकेने कोट्यवधी रुपयांचा केलेला खर्च वाया गेल्याने पालकांनी संताप व्यक्त केला आहे.

" पालिकेतील विविध विभागांचा आढावा घेतला. पालिकेच्या शाळांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येतात. यंदा विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्यासंदर्भात चर्चा केली. ई-लर्निंग यंत्रणेबाबत देखील चर्चा झाली असून, ही यंत्रणा बंद असल्याची माहिती विभागप्रमुखांनी दिली. ही यंत्रणा का बंद आहे? याचे कारण त्यांनी सांगितले नाही. याबाबत अद्याप मला देखील पुरेशी माहिती नाही. यंदाच्या शैक्षणिक वर्षात ही यंत्रणा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

**- एम. जे. प्रदीप चंद्रन, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

# 323 रस्त्यांचे नऊ मीटर रुंदीकरण बारगळणार

## स्थायी समितीचा ठराव विखंडित करण्यासाठी फेरप्रस्ताव सादर करण्याचे राज्य शासनाचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील तब्बल 323 रस्त्यांच्या नऊ मीटर रुंदीकरणाचा महापालिकेच्या स्थायी समितीने मंजूर केलेला ठराव विखंडित करण्यासाठी फेरप्रस्ताव सादर करण्याचे आदेश राज्य शासनाने महापालिकेला दिले आहेत. त्यामुळे मध्यवस्तीसह शहरातील विविध भागातील अरुंद रस्त्यांचे रुंदीकरण बारगळणार असून, त्या भरवशावर इमारतीचे मजले उभारण्याचे अनेकांचे स्वप्न भंगले आहे.

महापालिकेच्या जुन्या हद्दीतील नऊ मीटरपेक्षा कमी रुंदीचे 323 सार्वजनिक रस्ते महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 च्या कलम 210 अन्वये (1) (ब) नऊ मीटर रुंदीचे करण्याचा निर्णय 9 जून 2020 रोजी स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आला होता. सत्ताधारी भाजपसह स्थायी समितीचे तत्कालीन अध्यक्ष हेमंत रासने यांनी त्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती. दरम्यान, तब्बल 323 रस्त्यांच्या रुंदीकरणावरून त्यावेळेस आरोप- प्रत्यारोपही झाले होते.




बांधकाम व्यावसायिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेण्याचा आरोपही झाला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने हा ठराव विखंडित करण्यासाठी शासनाला पाठविला होता. त्यातच या निर्णयाच्या विरोधात माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि प्रशांत बधे यांची उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने आदेशानुसार नगर विकास खात्याच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह याचिकाकर्त्यांची बैठक घेण्यात आली होती.

या बैठकीत याचिकाकर्ते केसकर यांनी रस्ता रुंदीकरणाच्या ठरावाची प्रक्रिया नियमानुसार पूर्ण झालेली नसल्याचे सांगत महापालिकेने संबंधित ठराव विखंडित करण्यासाठी पाठविला असल्याचे निदर्शनास आणले. तर आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी मात्र रस्ता रुंदीकरणाची प्रक्रिया महापालिकेच्या प्रचलित धोरणानुसारच केली असल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, या सुनावणीनंतर आता राज्य शासनाने 323 रस्त्यांच्या रुंदीकरणाचा स्थायी समितीचा जो ठराव प्रशासनाने विखंडित करण्यासाठी पाठविला होता, तो विखंडित करण्यासाठी शासनास पुन्हा पाठवावा, असे आदेश महापालिकेला दिले आहेत. त्यामुळे शहरातील मध्यवस्तीसह प्रमुख रस्त्यांचे रुंदीकरण बारगळणार असल्याचे स्पष्ट आहे.

" शहरातील सहा मीटरचे 323 रस्ते नऊ मीटर करण्याचा ठराव विखंडित करण्यासाठी फेरप्रस्ताव सादर करण्याचा निर्णय शहराच्या नियोजनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. आता महापालिका आयुक्तांनी स्वतःच्या अधिकारात जे काही रस्ते रुंदीकरणाचे निर्णय घेतले आहेत. त्यांना स्वतःच्या अधिकारात आयुक्तांनी स्थगिती द्यावी. दहा दिवसांत हा निर्णय आयुक्तांनी घेतला नाही तर नगरविकास विभागाकडे दाद मागितली जाईल.

**- सुधीर कुलकर्णी, नागरि हक्क संस्था.**

# एसटीपी बंद, तर सोसायटीचे पाणीही बंद

## नोटीस देऊनही प्रकल्प बंद ठेवणाऱ्या 184 सोसायट्यांबाबत महापालिका आक्रमक; 264 सोसायट्यांत प्रकल्प सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बंद असल्याने महापालिका आता कडक पावले उचलण्याच्या तयारीत आहे. सध्या शहरात ४५६ मोठ्या सोसायट्या आहेत. त्यापैकी २६४ सोसायट्यांनी एसटीपी सुरु केले आहेत. मात्र, उर्वरित १८४ सोसायट्यांमधील एसटीपी प्रकल्प बंद अवस्थेत आहेत. यावर महापालिकेने लक्ष घातले असून संबंधित सोसायट्यांना दोन ते तीन वेळा नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. तरीही या सोसायट्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे आता त्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.



### नियमांनुसार एसटीपी आवश्यक

» 'यूडीसीपीआर' नियमानुसार, २० हजार चौ.मी. क्षेत्र, १०० सदनिका किंवा दररोज २० हजार लिटरपेक्षा अधिक पाण्याचा वापर करणाऱ्या सोसायट्यांना सांडपाण्याचे पुनर्वापर आणि पुनर्भरण बंधनकारक आहे.

पिंपरी-चिंचवड शहर वेगाने विस्तारत आहे. लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. यामुळे पाण्याची मागणीही प्रचंड वाढली आहे. सध्या शहरवासीयांना रोज ६३० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी पुरवले जाते. तरीही अनेक सोसायट्यांना टँकर पाण्यावरच अवलंबून राहावे लागत आहे. काही सोसायट्यांचा दरमहा टँकरचा खर्च सव्वा लाख ते दीड लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या २७ लाखांवर गेली आहे. पाण्याची गरज भागवण्यासाठी महापालिका पवना धरणातून प्रतिदिन ५२० दशलक्ष लिटर (एमएलडी), आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून २०, असे ६२० दशलक्ष लिटर पाणी उचलते. यापैकी ४० टक्के पाण्याची गळती व चोरी होत असल्याचे प्रशासन काही वर्षांपासून सांगत आहे. मात्र, त्यावर ठोस उपाय अद्याप सापडत नाही, अशी स्थिती आहे. लहान गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांना १३५ लिटर प्रतिदिन प्रतिमाणशी, तर मोठ्या संस्थांमधील रहिवाशांना ९० लिटर पाणी दिले जाते. जास्त पाणी लागणाऱ्या संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील प्रक्रिया झालेल्या पाण्याचा वापर करणे बंधनकारक आहे. पिंपरी-चिंचवड शहर चारही बाजूने विस्तारत असून लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही वाढू लागली आहे. सध्यःस्थितीत शहरवासीयांना ६२० ते ६३० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी एका दिवसाला दिले जात आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील अनेक मोठ्या सोसायट्यांना टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे काही सोसायट्यांचा पाण्याचा दरमहा खर्च सव्वा लाख ते दीड लाख रुपयांवर गेला आहे.

### थोडक्यात मुद्दे

- » ४५६ पैकी २६४ सोसायट्यांत एसटीपी कार्यान्वित
- » १८४ सोसायट्यांत एसटीपी बंद
- » ८ सोसायट्यांनी महापालिकेला प्रवेश नाकारला
- » आता पाणीपुरवठा खंडित करण्याची तयारी

### नोटीस मिळालेल्या सोसायट्या

- » ८४ सोसायट्यांना पहिली नोटीस
- » ५० सोसायट्यांना दुसरी नोटीस
- » ५० सोसायट्यांना तिसरी नोटीस

> एसटीपी सुरू करण्यासंबंधी आम्ही वेळोवेळी पत्रव्यवहार व नोटीस दिल्या आहेत. मात्र, अनेक सोसायट्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे आता आम्ही पाणीपुरवठा खंडित करू.
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

---

# रुंदीकरणाचे घोडे कागदावरच अडले; प्रस्ताव तयार करून सहा वर्षे उलटली, नुसत्याच राजकीय चर्चा...

## पुणे-नाशिक महामार्ग रुंदीकरणासाठी निधीची प्रतीक्षा; जमीन अधिग्रहणाचे कामही रखडले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसह उत्तर पुणे जिल्ह्याला नाशिकशी जोडणारा महत्त्वाचा पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग अनेक वर्षांपासून अपुरा, अरुंद आणि धोकादायक स्थितीत आहे. गेल्या काही वर्षांपासून या महामार्गाच्या रुंदीकरणाची मागणी सातत्याने होत असतानाही प्रत्यक्षात अद्याप निधीच मिळालेला नाही. परिणामी, हे रुंदीकरणाचे काम कागदावरच अडकून पडले आहे.



या महामार्गावर दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून या मार्गाचे अत्यंत महत्त्व असून, या मार्गावर अपघातांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. चिंचवड, आकुर्डी, निगडी, भोसरी, मोशी, चाकण, राजगुरूनगर, मंचर, आळेफाटा ते नाशिकपर्यंत मोठा औद्योगिक पट्टा आहे. याच मार्गावरून मालवाहतूकही मोठ्या प्रमाणावर होते. मात्र, दोन लेन असलेला हा महामार्ग पुरेसा न ठरल्यामुळे वाहतूक कोंडी व अपघाताचे प्रमाण वाढत चालले आहे.

२०१८ साली केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या महामार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव तयार केला होता. सध्या या रस्त्यावर अपुऱ्या रुंदीमुळे वाहने एकमेकांच्या अगदी जवळून जातात, त्यामुळे अनेक वेळा धक्के, अपघात आणि ट्रॅफिक जाम होत असते. अनेकवेळा अपघातांमुळे रस्ता तासन्तास बंद राहतो. या पार्श्वभूमीवर २०१८ साली तयार झालेला रुंदीकरणाचा प्रस्ताव हा भविष्यातील गरज लक्षात घेऊन तयार करण्यात आला होता. मात्र त्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारकडून अद्याप निधीची वाट पाहावी लागत आहे.

### नुसत्याच राजकीय चर्चा...

» पिंपरी-चिंचवड, चाकण, राजगुरुनगर परिसरातील उद्योगधंद्यांमुळे या महामार्गावर सतत ट्रक, कंटेनर, मालवाहू वाहने मोठ्या प्रमाणावर ये-जा करत असतात. यामुळे सामान्य प्रवाशांना सुरक्षित व सुलभ प्रवास करणे कठीण झाले आहे. अनेक वेळा अपघातामुळे वाहने लांबच लांब रांगेत थांबतात. ही परिस्थिती टाळण्यासाठी रुंदीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू व्हावे, अशी मागणी स्थानिक नागरिक आणि औद्योगिक क्षेत्रातून सातत्याने केली जात आहे.

### पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागेना

» या पार्श्वभूमीवर खासदार श्रीरंग बारणे यांनी नुकतेच केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन हा प्रश्न मांडला. स्थानिक आमदार अशोक पवार यांनीही विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी महामार्गाच्या कामाला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे. स्थानिक व्यापारी आणि उद्योजक संघटनांनीदेखील या विषयावर एकत्र येत निवेदनाद्वारे राज्य सरकारकडे मागणी केली आहे.

# वीज ग्राहकांना बसविण्यात येणारे मीटर हे फक्त टीओडीच

## टीओडी मीटर हे ग्राहकांच्या फायद्याचेच असून ग्राहकांनी अफवांना बळी पडू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महावितरणमार्फत बसवण्यात येणाऱ्या टीओडी (टाईम ऑफ डे) मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची माहिती दर तासानुसार (रियल टाईम) उपलब्ध होणार आहे. यामुळे ग्राहकांचे त्यांच्या वीज वापरावर व पर्यायाने वीज बिलावर नियंत्रण राहणार आहे. तसेच अचूक व वेळेत बिल मिळणार आहे. टीओडी मीटर हे पोस्ट पेड असून मीटर रीडिंगनुसारच त्याचे बिल देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्राहकांवर कोणताही खर्चाचा भार न टाकता बसवण्यात येणारे टीओडी मीटर हे ग्राहकांच्या फायद्याचेच असून ग्राहकांनी अफवांना बळी पडू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे.

बारामती परिमंडलात सध्या नवीन वीज जोडणी करता देखील टीओडी मीटर वापरण्यात येत आहेत. टीओडी मीटर बसवण्याच्या करारानुसार ठेकेदाराने मीटर बसवून या मीटरची देखभाल दहा वर्षे करायची आहे. मात्र, काही भागात गैर समजातून ग्राहक उपयोगी टीओडी मीटरला विरोध करत आहेत. हा विरोध निराधार असून ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आदी योजनांमुळे दिवसा स्वस्त दरात वीज उपलब्ध होत आहे. वीज वापरानुसार रीडिंग येत नसेल तर ग्राहकास हे कळणार आहे. बसवण्यात येणारे टीओडी मीटर हे राष्ट्रीय मानांकनप्राप्त लॅबमधून चाचणी केलेले असल्याने ग्राहकांना वापरा इतकेच वीज बिल मिळणार आहे. अत्यंत नावीन्यपूर्ण अशी पारदर्शी सुविधा वीज ग्राहकांना नव्या टीओडी मीटरमुळे मिळणार आहे. औद्योगिक ग्राहकांच्या धर्तीवर घरगुती ग्राहकांनाही दुपारच्या वेळी वीज दरात सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव महावितरणने वीज नियामक आयोगाकडे सादर केला आहे. सध्या बसवण्यात येणाऱ्या मीटरमध्ये टीओडी (टाईम ऑफ डे) ही सुविधा उपलब्ध असून ग्राहकांना स्वस्त वीज दराचा फायदा होणार आहे. जून्या मीटरमध्ये टीओडी ही सुविधा नसल्याने ग्राहकांना दिवसा स्वस्त वीज दराचा फायदा मिळू शकणार नाही.



### टीओडी मीटरद्वारे ग्राहकांचे बिलावर नियंत्रण

» टीओडी मीटरमधून वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक युनिटची रिअल टाईम माहिती ही ग्राहकास मोबाईलवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वीज वापरानुसार रीडिंग येत नसेल तर ग्राहकास हे कळणार आहे. बसवण्यात येणारे टीओडी मीटर हे राष्ट्रीय मानांकनप्राप्त लॅबमधून चाचणी केलेले असल्याने ग्राहकांना वापरा इतकेच वीज बिल मिळणार आहे. अत्यंत नावीन्यपूर्ण अशी पारदर्शी सुविधा वीज ग्राहकांना नव्या टीओडी मीटरमुळे मिळणार आहे.

### खर्चाचा भार ग्राहकांवर नाही

» अद्ययावत मीटर बसविल्याने महावितरणची वाणिज्यीक हानी कमी होणार आहे. तसेच वीजचोरीवर नियंत्रण येणार आहे. त्यामुळे होणाऱ्या महसूल वाढीतूनच टीओडी मीटरचा खर्च भागविण्यात येणार आहे.

### मीटरमध्ये 'टीओडी' सुविधा गरजेची

» राज्यात सुरू असणाऱ्या रुफ टॉप सोलर, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आदी योजनांमुळे दिवसा स्वस्त दरात वीज उपलब्ध होत आहे. भविष्यात दिवसा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारी वीज वापरली जावी यासाठी औद्योगिक ग्राहकांच्या धर्तीवर घरगुती ग्राहकांनाही दुपारच्या वेळी वीज दरात सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव महावितरणने वीज नियामक आयोगाकडे सादर केला आहे. सध्या बसवण्यात येणाऱ्या मीटरमध्ये टीओडी (टाईम ऑफ डे) ही सुविधा उपलब्ध असून ग्राहकांना स्वस्त वीज दराचा फायदा होणार आहे. जून्या मीटरमध्ये टीओडी ही सुविधा नसल्याने ग्राहकांना दिवसा स्वस्त वीज दराचा फायदा मिळू शकणार नाही.

# महायुतीकडून सत्तेचा सौदा, राजगुरूनगरात आमदार रोहित पवारांचा घणाघात

## सामान्यतः मलेरिया पावसाळ्यात किंवा त्यानंतर जास्त प्रमाणात वाढतो. मात्र, हवामान बदलामुळे वर्षभर कधीही मलेरियाचा धोका असतो.

**पुणे | प्रतिनिधी**

लाडक्या बहिणीसाठी योजना आणि छोट्या-मोठ्या नेत्यांना विकत घेऊन महायुतीने सत्ता मिळवली आहे. सत्ता आल्यानंतर राज्यातील मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जात आहे, असा घणाघात आमदार रोहित पवार यांनी महायुतीच्या सरकारवर केला.

आमदार रोहित पवार हे एका कार्यक्रमासाठी राजगुरूनगर येथे आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आमदार रोहित पवार म्हणाले की, सरकार मूलभूत प्रशांकडे सरकार लक्ष देत नाही. पाणी, वीज, आरोग्य, रस्ते या प्रश्नाकडे सरकार लक्ष देत नाही. नोकऱ्यांसाठी कोणी आंदोलन करीत नाही. लाडक्या बहिणींना पैसे मिळत नाहीत त्यासाठी कोणी आंदोलन करीत नाहीत. राज्यातील जनतेचा जीवन मरणाचा प्रश्न असताना त्याकडे सरकारचे लक्ष नाही. मात्र मुद्दामहून हिंदू-मुस्लीम वाद निर्माण करून त्याकडे लक्ष वेधले जात आहे.

पुणे जिल्हात दररोज 20 मुली, महिला बेपत्ता होत आहेत. केवळ पुणे शहरात वर्षभरात 650 महिलांवर बलात्कार आणि 850 विनयभंगाच्या तक्रारी पुणे शहरात झाल्या आहेत तर ग्रामीण आणि राज्यात त्यांचे प्रमाण अधिक आहे. गेल्या तीन वर्षात मुली महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. याबाबत ठोस निर्णय सरकारकडून घेतले जात नाहीत.

राज्यात कायदा – सुव्यवस्था ढासळली आहे. बिहार सारखी स्थिती आपल्या राज्यातील झाली आहे. प्रचारात राजकीय लोक गुंडाना घेऊन फिरतात. सर्व सामान्य माणूस गुंडांच्या गराड्यात सापडला आहे. सार्वजनिक ठिकाणी गुंडाना सोबत घेतात. त्यामुळे त्यांच्यावरचा पोलिसांचा धाक कमी होत आहे. जनतेने तुम्हाला बहुमत दिले आहे. तुम्ही नेते म्हणून भांडू नका, तर जनतेचे प्रश्न सोडवा. गुंडांवर कारवाई करा, असे त्यांनी नमूद केले.



### उद्धव-राज, शरद पवार – अजित पवार एकत्र येतील

» एखादा परिवार फुटला होता तो एकत्र येत असेल तर ती गोष्ट परिवाराच्या हिताची आहे. उद्धव ठाकरे- राज ठाकरे एकत्र येत असतील तर त्यांचे स्वागत केले पाहिजे. लोक कसे रीऍक्ट होतील हा त्यांचा प्रश्न आहे; परंतु पवार परिवार म्हणून आम्ही एक आहोत. राजकीय दृष्टया आम्ही वेगळे आहोत. एकत्र यायचे का नाही ते शरद पवार , सुप्रिया सुळे आणि अजित पवार हे तिघे जण जेंव्हा एकत्र येतील. त्यावेळी तो निर्णय होईल. जनतेची भावना नेत्यांनी विचारात घेतली पाहिजे.

### सरकारवर जनतेची नाराजी...

» राज्यात निवडणुकीदरम्यान पंतप्रधान आणि महा युतीच्या नेत्यांनी देखील सांगितले होते. निवडणुकीदरम्यान सरकारी तिजोरी रिकामी केली. आम्ही नोकऱ्या देऊ. सोयाबीन आणि शेती मालाला रास्त भाव देऊ लाडक्या बहिणींना दर महिना 2100 रुपये देऊ, देवदेव करण्यासाठी पैसे देऊ. अनेक योजना राबवू मात्र आज तशी परिस्थिती नाही. ही सर्व आश्वासने धुळीस मिळाली आहेत त्यामुळे आज जनता या सरकारवर तीव्र नाराज आहे असे आमदार रोहित पवार यांनी स्पष्ट केले.